ISSN – 2277-7911
Impact Factor – 5.077

YOUNG RESEARCHER
*A Multidisciplinary Peer-Reviewed Refereed Research Journal*

Oct-Nov -Dec 2023
Vol. 12 No. 4

# सार्वजनिक वितरण प्रणालीचे विश्लेषण : महाराष्ट्र राज्यांतर्गत नांदेड जिल्ह्याचा वाटा

**प्रा.डॉ. डी .डी. भोसले[1] व आकांक्षा दीपक भोरे[2]**

*[1]मार्गदर्शक, सहा.प्रा., अर्थशास्त्र विभाग आणि संशोधन केंद्र, यशवंत महाविद्यालय, नांदेड.*

*[2]संशोधक विद्यार्थिनी, यशवंत महाविद्यालय, नांदेड.*

*Corresponding Author:* ***आकांक्षा दीपक भोरे***

**DOI - 10.5281/zenodo.10642906**

**गोषवरा *(Abstract):***

*प्रस्तुत संशोधनात संशोधकाने सार्वजनिक वितरण प्रणालीचे विश्लेषण : महाराष्ट्र राज्यांतर्गत नांदेड जिल्ह्याचा वाटा या शिर्षकांतर्गत महाराष्ट्रातील शिधापत्रिका धारकांच्या वाढबरोबरच नांदेड जिल्ह्यातील शिधापत्रिका धारकांच्या संख्येत किती वाढ होता आहे हे अभ्यासले आहे. अध्ययन कालावधी 2012-2013 ते 2021- 2022 असा सलग 10 वर्षाचा कालावधी निवडला आहे तसेच  अध्यानासाठी विश्लेणात्मक आणि वर्णनात्मक संशोधन पद्धतीचा वापर केला आहे. संशोधकाने द्वितीय आधार सामग्रीचा अवलंब केला असून, याअंतर्गत संशोधकाने सरकारी अहवाल, माहिती पुस्तिका आणि संकेत स्थळांचा अवलंब केला आहे तसेच तथ्यांचा विश्लेषणासाठी वृद्धीदर, शेकडेवारी तसेच आलेख आणि स्थंभालेख यांचा अवलंब केला आहे.*

---

**प्रस्तावना (Introduction):**

हे न जाणावे साधारण अन्न हे ब्रह्मरूप जाण
जे जीवन हेतू कारण विश्वायया

संत ज्ञानेश्वर म्हणतात, अन्न हेच ब्रह्म आहे. अर्थातच ज्याप्रमाणे संपूर्ण विश्वाची उत्पत्ती ब्रह्मदेव करत असतात व शेवटी संपूर्ण विश्व ब्रह्मदेवातच विलीन होत असते. त्याचप्रमाणे संपूर्ण सजीवांची उत्पत्ती अन्नातून होत असते आणि अंततः सर्व सजीव अन्नातच विलीन होत असतात. यावरून जीवन जगण्यासाठी अन्न किती महत्त्वाचे आहे हे समजू शकतो.

अन्नं विना मनुष्यः म्रियते
दारिद्र्यं खलु पुरुषस्य जीवितम मरणम

अर्थात अन्नविना मनुष्य मरण पावते, परंतु दारिद्र्य हे पुरुषाचे जिवंतपणी मरण आहे. अन्न हा मनुष्याचा आधार आहे परंतु प्रत्येक मनुष्य आपली ही गरज स्वतः पूर्ण करू शकते असे नाही. यामुळेच जॉन केन्स यांच्या देशाच्या विकासासाठी सरकारी हस्तक्षेप आवश्यक आहे या विचार प्रणालीला आधार म्हणून भारताने सार्वजनिक वितरण प्रणालीची सुरुवात केली.

**इतिहास (History):**

सर्वसाधारणपणे सार्वजनिक वितरण प्रणालीची सुरुवात दुसऱ्या महायुद्धाच्या काळात झाली.एकीकडे युद्धामुळे अन्नधान्याच्या किमती वाढू लागल्या तर दुसरीकडे सततच्या दुष्काळामुळे अन्नधान्याचे उत्पादन घटू लागले. अन्नधान्याच्या अभावामुळे भूक मरीची समस्या निर्माण झाली तेव्हा या समस्येचे निराकरण करण्यासाठी परदेशातून अन्नधान्याची मागणी करण्यात आली. मागवलेले अन्नधान्य संपूर्ण जनतेत वितरित करण्यासाठी सार्वजनिक वितरण व्यवस्थेची निर्मिती करण्यात आली.

**अर्थ (Meaning):**

समाजातील कमकुवत घटकांना शासनाद्वारे माफक दरात अन्नधान्य उपलब्ध करून देणारी व्यवस्था म्हणजे सार्वजनिक वितरण प्रणाली होय.

**कार्यप्रणाली (Functioning):**

सार्वजनिक वितरण प्रणाली अंतर्गत गरीब व गरजू कुटुंबांचे अंत्यदय अन्न कुटुंब आणि प्राधान्य कुटुंब अशी वर्गवारी करण्यात आली आहे यानुसार अंत्योदय अन्न गटातील कुटुंबाचे मासिक उत्पन्न पंधरा हजारापेक्षा कमी असून त्यांना प्रतीमहा 35 किलो अन्नधान्य उपलब्ध करून दिले जाते तर प्राधान्य गटातील कुटुंबाचे मासिक उत्पन्न पंधरा हजार ते ऐकोणसाठ हजार असून, प्रति व्यक्ती 5 किलो धान्य उपलब्ध करून दिले जाते.

केंद्र सरकारची प्रतिनिधी संस्था भारतीय अन्न महामंडळ याद्वारे शेतकऱ्यांकडून अन्नधान्याची खरेदी केली जाते. भारतीय अन्न महामंडळ हे अन्नधान्य राज्य सरकारच्या गोदामांपर्यंत पाठवते तर राज्य सरकार शिधापत्रिकाधारकांची ओळख करून, स्वस्तधान्य दुकानांमार्फत त्यांच्यापर्यंत अन्नाची पोहोच करत असते करत.

**संशोधनाची उद्दिष्टे (Research Objectives):**

1) वर्ष 2012-13 ते 2021-22 या कालावधी दरम्यान महाराष्ट्र राज्यातील शिधापत्रिकाधराकांतर्गत नांदेड जिल्ह्याच्या शिधापत्रिकाधारकांच्या वट्यांचा अभ्यास करणे.
2) वर्ष 2012-13 ते 2021-22 या कालावधी दरम्यान महाराष्ट्र राज्यातील स्वस्त धान्यदुकानांतर्गत नांदेड जिल्ह्याच्या स्वस्त धान्य दुकानांच्या वट्यांचा अभ्यास करणे.

**संशोधनाची गृहीतकृत्ये (Research Hypothesis):**

1) वर्ष 2012-13 ते 2021-22 या कालावधी दरम्यान महाराष्ट्र राज्यातील शिधापत्रिकाधराकांतर्गत नांदेड जिल्ह्याच्या शिधापत्रिकाधारकांच्या वाट्यात वाढ होत आहे.
2) वर्ष 2012-13 ते 2021-22 या कालावधी दरम्यान महाराष्ट्र राज्यातील स्वस्त धण्यदुकानातर्गत नांदेड जिल्ह्याच्या स्वस्त धान्य दुकानदारांच्या वाट्यात वाढ होत आहे.


**संशोधन पद्धती (Research Methodology):**

प्रस्तुत संशोधनात संशोधकाने तथ्य संकलनासाठी द्वितीय आधारसामग्रीचा आधार घेतला आहे. अंतर्गत विविध सरकारी अहवाल, दस्तऐवज, माहिती पुस्तिका यांचा वापर करण्यात आला आहे तसेच तथ्यांचे विश्लेषण करण्यासाठी वर्णनात्मक व विश्लेषणात्मक संशोधन पद्धतीचा अवलंब केला आहे. तथ्यांच्या विश्लेषणाकरिता वृद्धीदर, शेकडेवारी या सांख्यिकीय तंत्रांचा तसेच तक्ता व आलेख पद्धती यांचा वापर करण्यात आला आहे.

**महाराष्ट्र राज्य अंतर्गत नांदेड जिल्ह्यातील शिधापत्रिकाधारकांचे विश्लेषण:**

**(Analysis of Ration Card Holders in Nanded District under Maharashtra State)**

**स्तंभालेखा 1: महाराष्ट्र राज्य अंतर्गत नांदेड जिल्ह्यातील शिधापत्रिकाधारकांचे अध्यायन**




स्तंभालेख 1 चे अध्ययन केले असता आपणास असे दिसून येते की, महाराष्ट्र राज्यातील शिधापत्रिका धारकांची संख्या 2012-13 पासून ते 2019-20 या कालावधी दरम्यान 2,26,29,261 वरून 2,53,70,122 पर्यंत वाढली मात्र वर्ष त्या नंतर 2020-21 पर्यंत यात घट झाल्याचे निळ्या आलेख रेषेवारून दिसून येते तर वर्ष 2021-22 मध्ये यात पुनः वाढ

झाली.नांदेड जिल्ह्यातील शिधापत्रिकाधारकांची संख्या आणि जिल्ह्याचा राज्याच्या तुलनेत वाटा यामध्ये मात्र स्थिर दराने वृद्धी होत असल्याचे आलेखावरून दिसून येते.

**तक्ता 1: महाराष्ट्र राज्य अंतर्गत नांदेड जिल्ह्यातील शिधापत्रिकाधारकांचे अध्यायन**

| वर्ष | महाराष्ट्र राज्यातील शिधापत्रिका धारकांची संख्या (कोटी) | नांदेड जिल्हयातील शिधापत्रिका धारकांची संख्या (लाख) | जिल्ह्याचा राज्यातील वाटा (टक्केवारी) |
|---|---|---|---|
| **2012-2013** | 2,26,29,261 | 5,89,800 | 2.60 |
| **2013-2014** | 2,32,08,201 | 6,23,044 | 2.68 |
| **2014-2015** | 2,37,10,666 | 6,31,955 | 2.66 |
| **2015-2016** | 2,47,09,554 | 6,56,051 | 2.65 |
| **2016-2017** | 2,47,93,206 | 6,66,036 | 2.68 |
| **2017-2018** | 2,56,35,611 | 6,70,757 | 2.61 |
| **2018-2019** | 2,78,21,108 | 7,37,340 | 2.29 |
| **2019-2020** | 2,53,70,122 | 7,54,393 | 2.97 |
| **2020-2021** | 2,53,24,,706 | 7,63,147 | 3.01 |
| **2021-2022** | 2,56,34,978 | 7,28,011 | 2.83 |


**स्त्रोत: महाराष्ट्राची आर्थिक पाहणी अर्थ व सांख्यिकी संचालनालय महाराष्ट्र शासन वर्ष 2012 ते 2022**

तक्ता क्रमांक 1 चे अध्ययन केले असता असे लक्षात येते की, वर्ष 2012-13 ते वर्ष 2021-22 या कालावधी अंतर्गत महाराष्ट्र राज्यातील शिधापत्रिकाधारकांची संख्या 2012–13 मध्ये 2,26,29,261 होती तर वर्ष 2021-22 मध्ये 2,56,34,978 इतकी वाढली. या दहा वर्षाच्या कालावधीमध्ये राज्यातील शिधापत्रिकाधारकांच्या संख्येत 13% ने वाढ झाली. तर नांदेड जिल्ह्यातील शिधापत्रिका धारकांची संख्या वर्ष 2012-13 मध्ये 5,89,800 होती. ज्यात 2021-2022 मध्ये 23% म्हणजेच 7,28,011 वाढली. याच कालावधी अंतर्गत राज्याच्या तुलनेत जिल्ह्याचा वाटा हा 2.6 वरून 2.83 पर्यंत वाढला. ही वाढ 0.8 इतकी आहे.

**महाराष्ट्र राज्य अंतर्गत नांदेड जिल्ह्यातील स्वस्त धान्य दुकानदारांची विश्लेषण:**

**(Analysis of Ration Card Holders in Nanded District under Maharashtra State)**

**स्तंभालेखा 2: महाराष्ट्र राज्य अंतर्गत नांदेड जिल्ह्यातील स्वस्त धान्य दुकानांचे अध्यायन**




स्तंभालेख 2 अध्ययन केले असता आपणास असे लक्षात येते की, दहा वर्षाच्या कालावधीमध्ये महाराष्ट्र राज्यातील स्वस्त धान्य दुकानांची संख्या तसेच नांदेड जिल्ह्यातील स्वस्त धान्य दुकानांची संख्या वाढत आहे. हे अनुक्रमे निळया व भगव्या रंगाच्या आलेख रेषेवरून स्पष्ट दिसत आहे. जिल्ह्याचा राज्यातील वाटा 3.73 वरून 3.80% पर्यंत अल्पशा प्रमाणात वाढण्याचा दिसून येते. यामुळेच जिल्ह्याचा राज्यातील वाटा दर्शवणारी रेषा ox अक्षाला समांतर असल्याचे दिसते.

**तक्ता 2: महाराष्ट्र राज्य अंतर्गत नांदेड जिल्ह्यातील स्वस्त धान्य दुकानांचे अध्यायन**

| वर्ष | महाराष्ट्र राज्यातील स्वस्त धान्य दुकानांची संख्या (हजार) | नांदेड जिल्हयातील स्वस्त धान्य दुकानांची संख्या (हजार) | जिल्ह्याचा राज्यातील वाटा (टक्केवारी) |
|---|---|---|---|
| **2012-2013** | 51,667 | 1929 | 3.73 |
| **2013-2014** | 50,339 | 1929 | 3.89 |
| **2014-2015** | 51,193 | 1929 | 3.76 |
| **2015-2016** | 51,910 | 1973 | 3.80 |
| **2016-2017** | 51,204 | 1977 | 3.86 |
| **2017-2018** | 51,275 | 1988 | 3.87 |
| **2018-2019** | 51,922 | 1720 | 3.31 |
| **2019-2020** | 52,423 | 1720 | 3.28 |
| **2020-2021** | 52,513 | 1998 | 3.78 |
| **2021-2022** | 52,557 | 2000 | 3.80 |

**स्त्रोत: महाराष्ट्राची आर्थिक पाहणी अर्थ व सांख्यिकी संचालनालय महाराष्ट्र शासन वर्ष 2012 ते 2022**

तक्ता क्रमांक दोनचे अध्ययन केले असता असे लक्षात येते की, वर्ष 2012-13 ते 2021-22 या कालावधीमध्ये महाराष्ट्र राज्यातील स्वस्त धान्य दुकानांची संख्या 51,667 पासून 52,557 पर्यंत वाढली आहे. दहा वर्षांच्या कालावीतील ही वृद्धी 1.72% इतकी आहे तर याच कालावधी अंतर्गत नांदेड जिल्ह्यातील स्वच्छ धान्य दुकानांची संख्या 1929 वरून 2000 पर्यंत वाढली आहे म्हणजेच 3.6% वृध्दी झाली आहे. जिल्ह्याचा राज्यातील वाटा 3.73% वरून 3.8 टक्क्यांपर्यंत वाढला आहे. ही वाढ 0.7% इतकी आहे. महाराष्ट्र राज्याच्या तुलनेत नांदेड जिल्ह्यातील स्वस्त धान्य दुकानांच्या संख्येत वाढ झाली असल्याचे दिसून येत असले तरी जिल्ह्याचा राज्यातील वाटा हा तुलनेने कमी प्रमाणात वाढल्याचे दिसून येते.

**निष्कर्ष (Conclusion):**

1) महाराष्ट्र राज्यातील शिधापत्रिका धारकांच्या संख्येत 13 टक्क्यांनी वाढ झाली आहे.
2) नांदेड जिल्ह्यातील शिधापत्रिकाधारकांच्या संख्येत 23 टक्क्यांनी वाढ झाली आहे.
3) महाराष्ट्र राज्य अंतर्गत नांदेड जिल्ह्यातील शिधापत्रिकाधारकांचा वाटा 2.60 वरून 2.83 पर्यंत वाढला आहे.
4) महाराष्ट्र राज्यातील स्वस्त धान्य दुकानांची संख्या 1.72 टक्क्यांनी वाढली आहे.
5) नांदेड जिल्ह्यातील स्वस्त धान्य दुकानांची संख्या 3.6 टक्क्यांनी वाढली आहे.
6) महाराष्ट्र राज्य अंतर्गत नांदेड जिल्ह्यातील स्वस्त धान्य दुकानांचा वाटा 3.73 टक्क्यावरून 3.80% पर्यंत वाढला आहे.

**सारांश (Conclusion):**

अशाप्रकारे उपरोक्त विवेचनावरून आपणास सार्वजनिक वितरण व्यवस्थेचा अर्थ स्पष्ट होतो तसेच सार्वजनिक वितरण प्रणालीचा इतिहास आणि कार्यप्रणाली ही आपण अभ्यासली आहे. अभ्यासावरुन असे निदर्शनास आले की, महाराष्ट्र राज्यातील शिधापत्रिका धारकांच्या आणि स्वत धान्य दुकानांच्या संख्येत वाढ होत आहे. त्याचप्रमाणे नांदेड जिल्ह्यातील शिधापत्रिका धारकांच्या आणि स्वत धान्य दुकानांच्या संख्येत ही वाढ होत आहे. राज्यातील शिधापत्रिका धारकांच्या संख्येत

जिल्ह्याचा वाटा 2012 ते 2022 या 10 वर्षांच्या कालाधीत 2.60 वरून 2.83 पर्यंत वाढला आहे तर स्वस्त धान्य दुकानांचा वाटा 3.73% वरून 3.80 टक्क्यांपर्यंत वाढला आहे.

**संदर्भ सूची (References):**

**संदर्भ ग्रंथ (Reference Books):**

1) आगलावे प्र. (2010). संशोधन पद्धती व तंत्रे , श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर. अच्युत (2015). *अर्थात* ,राजहंस प्रकाशन, पुणे.
2) बोधनकर सुधीर, अलोनी वी., कुलकर्णी मृणाल (1999). *सामाजिक संशोधन पद्धती,* साईनाथ प्रकाशन नागपूर.
3) Mishra Bhagwat (1985). Economics of public distribution system in food grains, South Asian books.

**संदर्भ सरकारी अहवाल (Government Reports:**

4) जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन नांदेड जिल्हा, (अंक 2012 ते 2022), माहिती व प्रसारण मंत्रालय महाराष्ट्र सरकार
5) महाराष्ट्राची आर्थिक पाहणी,(अंक 2012 ते 2022) माहिती व प्रसारण मंत्रालय महाराष्ट्र सरकार.

**संदर्भ संकेतस्थळ (Websites):**

6) https://mahafood.gov.in
7) https://mahades.maharashtra.gov.in
8) https://fci.gov.in
9) https://nfsa.gov.in
10) https://en.m.wikipedia.org